INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 6 | JULY– 2025

# दलित कादंबरीतील दलितांच्या जगण्याचा संघर्ष

श्रीमती. रुक्मिन किशनराव वाघमोडे
रा.कुर्डूवाडी ता.माढा जि.सोलापूर

## प्रास्ताविक :



मराठीसाहित्यात दलितसाहित्याने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.दलितसाहित्यिकांनी 'कादंबरी' हा प्रकारकमीहाताळला असला तरी, वाङ्मयीन मूल्यांनी आणि गुणात्मक दर्जाने आपले श्रेष्ठत्व सिद्धकेले आहे.दलित कादंबरीतून दलितांच्या जगण्याचा संघर्ष मोठ्या प्रमाणात समोर आला आहे.शिक्षण घेऊन आत्मभान आलेली नवी दलित पिढी संवेदनशील मनाने आपल्या जीवनाचा संघर्ष पोटतिडकीने कादंबरीतून मांडू लागली.

हजारो वर्षांच्या मूकसमाजाचे उद्रेक कादंबरीतून विद्रोहाचे अंगार घेऊन बाहेर पडले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयाने आणि त्यांच्या सामाजिक उद्धारातून या दलितसाहित्यिकांना अभिव्यक्तीचे अधिकार मिळाले.आणि तो लिहू लागला.या व्यवस्थेला जाब विचारु लागला. आमच्या वाट्याला आलेले अमानवी, पशुतूल्य जिणेहे ईश्वरनिर्मित नसूनते मानवनिर्मित आहे. आम्हाला पिढ्यान पिढ्या जगण्यासाठी संघर्ष करावा लागला.ही वेदना कादंबरीतून पुढे आली.दलित कादंबरीचे मुख्य आशयसूत्रहे दलितांच्या जीवनविषयक संघर्षातुन सिध्द होते.अस्तित्वासाठीचा संघर्ष,भाकरीसाठीचा संघर्ष करीत आपले आयुष्याचे चिंतन दलित लेखकांनी आपल्या कादंबरीतून मांडले आहे.

चार्वाक, बुध्द, म.फुले, डॉ.आंबेडकर यांच्या प्रेरणेतून लेखनकरणाऱ्या दलितसाहित्यिकांनी आपल्या जीवनाचा संघर्ष कादंबरीतून अधोरेखीतकेला आहे.

भारतीय समाजव्यवस्था ही विषम पातळीवर उभी आहे.वर्णव्यवस्थेतून शूद्र म्हणून दलितसमाजातील व्यक्तिंना गावकुसाबाहेरच आपले जीवन जगावे लागले.बहिष्कृत, उपेक्षित समाज म्हणून सामाजिक अवहेलनेला सामोरे जावे लागले. जातीयतेच्या चटक्यांनी आणि गावगाड्यातील समाजव्यवस्थेने त्यांना दिलेली दुय्यम वागणूक यातून पिढ्यानपिढ्या या समाजाचे शोषण झाले. आपल्यावरील अन्यायाचे, जगण्यासाठीच्या संघर्षाचे विद्रोही चित्रण दलित लेखकांनी आपल्या कादंबरीतून केले.

ज्या समाजाला जीवन जगताना अन्नासाठी, पाण्यासाठी संघर्ष करावा लागला; गुराढोरांप्रमाणेकष्ट करुनही उपासमारीने मरावे लागले.या सर्व गोष्टींच्या संघर्षाचे चित्रण दलित कादंबरीतून दिसून येते.

## दलित कादंबरीतील दलित जीवनाच्या संघर्षाचे स्वरुप :

दलित समाज गावगाड्यामध्ये गावाबाहेर एक उपेक्षित जिणं जगणारा समाज आहे.प्रस्थापित व्यवस्थेतील सवर्ण लोकांच्या शेतातकाम करुन आपली उपजीविका करुन तो जगत असतो.त्याच्या काबाडकष्टाला मात्र या गावगाड्यामध्ये प्रतिष्ठा नाही, मूल्य नाही.तो या व्यवस्थेच्या शोषणाची, पिळवणूकीचा मोठा भाग झालेला आहे.दलितांचे शोषणकरणारी व्यवस्था ही मनुवादी विचारसरणीवर आधारलेली असल्याने, पिळवणूक आणि शोषणाचे सर्व मार्ग ही व्यवस्था अवलंबिते.त्यांचे माणूसपण हिरावून घेवून, त्यांना गुलाम म्हणून जगवीते, यातून दलित समाजाला भाकरीसाठी, जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो.यातूनकधी दलितसमाजाने आपल्या न्याय हक्कांसाठीकधी आवाज उठवलाच तर त्यांना वाळीत टाकले जाते, त्यांच्यावर बहिष्कार टाकला जातो किंवा त्यांची नाकेबंदी केली जाते.या संघर्षाची अनेक उदाहरणे दलित कादंबरीतून पुढे आली आहेत. डॉ.आंबेडकरांच्या उदयानंतर मात्र या दलित समाजामध्ये स्वाभिमान आणि अस्मिता निर्माण झाली आणि आपल्यावरील अन्याय, अत्याचाराच्या विरोधात हा समाज बंड करु लागला. या व्यवस्थेला जाब विचारु लागला.यातूनही एक नवा संघर्ष पुढे आला.सुशिक्षित दलित तरुणांवरतीही प्रस्थापित समाज आगपाखड करु लागला.त्याला अडकिवण्यासाठी तो प्रयत्न करु

लागला.याचेही वास्तव व भयावह चित्रण दलित कादंबरीतून पुढे आले आहे.दलित जीवनाच्या संघर्षात ग्रामीण प्रस्थापित व्यवस्थेचा मोठाहात असल्याने अनेक दलित कादंबरीतून गावगाड्यातील दलित जीवनाच्या संघर्षाचे प्रभावी चित्रण आले आहे.

दलित कादंबरीतील दलित जीवनाच्या संघर्षाचे स्वरुप सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धाम्रिक आणि राजकीय आहे. या संघर्षाविषयी डॉ.सुशीलाढगे आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "संघर्ष हा मानवी जीवनातील एक अपरिहार्य घटकतर असतोच या संघर्षामुळे मनुष्याचेश्रेष्ठ असे धैर्य आणि त्याच्यातीलसुप्तगुण दृष्टीस पडतात." [१]दलित कादंबरीतून दलित जीवनाचा संघर्ष समोर येतानाहेगुणसुध्दासमोर येताना दिसतात.शतकानुशतके दलित समाजावरील अन्याय, अपमान, अप्रतिष्ठासहनकरीत या वेदनेतून, आणि संघर्षातून विद्रोहाचा, बंडखोरीचा जन्म झाला.दलित कादंबरीतून दलितांवरील अन्या, द्वेष, गुलामगिरी, दारिद्र्य, पारतंत्र्य यांचे प्रभावी चित्रण आले आहे.दलितांचा जगण्यासाठीचा संघर्ष हेच दलित कादंबरीचे आशयसूत्रठरते.दलित कादंबरीतून दलित जीवनविषयक संघर्ष अधोरेखितकरणाऱ्या कादंबऱ्या पुढीलप्रमाणे आहेत.

### 'फकिरा' कादंबरीतील दलित जीवनविषयक संघर्ष :

आण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी दलित समाजजीवनावर व त्यांच्या जीवन संघर्षावर भाष्य करणारी कादंबरी आहे. आण्णाभाऊ साठेहे स्वतः उपेक्षितसमाजातील असल्यानेत्यांनीहा संघर्ष स्वतः पाहिला आणि अनुभवलेला आहे. त्यामुळे दलित समाजाच्या जीवन संघर्षाचे चित्रण आण्णाभाऊंनी अत्यंत पोटतिडकीनेकेले आहे.दलितसमाजातील अन्याय, अत्याचार याविरुद्ध बंड करुन त्यांच्या पोटासाठी, त्यांना जगविण्यासाठी फकिरा आपल्या जीवची शिकस्तकरतो.'फकिरा' कादंबरीतून दलित समाजाच्या भूकेसाठीचा संघर्ष आला आहे.भाकरी मिळविण्यासाठी वणवण भटकणारा दलित समाज, काबाडकष्ट करुनही त्याला शेवटी उपाशीच रहावे लागते.शेवटी फकिरा चोऱ्या करुन, धान्य लुटून गरीबाला जगवितो.हा दलित समाज जगला पाहीजे.यासाठीकोणतेही धाडसकरण्याचीतयारी फकिरा ठेवतो.तेव्हा सरकार मांग समाजावर प्रचंडअन्याय करते.दिवसातून तुम्हीतीन वेळा चावडीवर हजेरी देण्यासाठी यायचं असे फर्मानसोडले जाते.गावातील खोत समाज आणि सरकार यांच्या कात्रीतसापडलेला दलित समाज मात्र; हा अन्या, अत्याचारसहनकरीत कसाबसा जीवन जगतो. आपण माणूस असूनहीहा किती अन्याय अत्याचारसहनकरीत जगत आहोत याची जाणीव तेथील दलित समाजाला होते, मात्र फकिरा रावसाहेब पाटलाला मात्र ठोकूनकाढतो आणि अन्याय, अत्याचारालातोंड देतो. फकिरा कादंबरीतून दलितसमाजाचे दुःख, वेदना, त्यांचा जगण्यासाठीचा संघर्ष त्यांना भाकरी मिळविण्यासाठी करावी लागणारी वणवण आणि गावगाड्यातील खोत, पाटील तत्सम प्रस्थापित लोकांकडूनहोणारा अन्याय आणि अत्याचार या दलित जीवनाच्या संघर्षाचे वेधक आणि भयावह वास्तव समोर आणले आहे.

### 'सावळा' या कादंबरीतील दलित जीवन संघर्ष :

'सावळा'ही शंकर भाऊ साठे यांची कादंबरी विद्यार्थी प्रकाशन, पुणे यांनी१९८९ मध्ये प्रकाशित केली.या कादंबरीतून 'सावळा' ही बंडखोर आणि अन्याय, अत्याचाराविरुद्ध उभी राहणारी एक प्रभावी व्यक्तिरेखा म्हणूनसमोर येते.या कादंबरीतून दलित जीवनाच्या संघर्षाचे चित्रण आले आहे.मातंग समाजाचा त्यांच्या जगण्यासाठीचा संघर्ष या कादंबरीतून पुढे आला आहे.शिवाय चोरीचा, गुन्हेगारीचा माथी मारलेला शिक्का आणि त्याच्यामुळे वाट्याला येणारा संघर्ष याचे अत्यंत प्रभावी आणि वेदनादायी चित्रण या कादंबरीतून आले आहे.मातंग समाजातील लोकांचा भूकेसाठीचा संघर्ष अत्यंत उत्कटतेने या कादंबरीतून आला आहे. आम्ही चोर आहोतहे जगाला दिसते परंतु आम्हाला जगण्यासाठी चोरी करावी लागते, हे वास्तव ही कादंबरी अधोरखितकरते. "आमची मांग जात चोऱ्या करुन जगतेहासरकारच्या दृष्टीनेगुन्हा आहे. परंतु उपाशी मरणेहागुन्हा नाही.त्या माणसाने टाचा घासूनखुशाल मरावे त्याच्याकडेकोणीही पहात नाही."[२]हाजगण्यासाठीचासंघर्ष या कादंबरीतून शंकर भाऊ साठे यांनी अत्यंत पोटतिडकीनेमांडला आहे.माणूस भाकरीसाठी काहीही करु शकतो.कारण जगणेहीत्याची प्राथमिकगरज असते यासाठी माणूसकोणत्याही वाट्याला जाऊ शकाते.याचे प्रभावी चित्रण या कादंबरीतून पुढे आले आहे.या कादंबरीतून दलित समाजाचा जगण्यासाठीचा संघर्ष तीव्रपणे समोर आला आहे."भूक, उपासमार, दुष्काळ यानेत्यांची हिम्मत खच्चीकेली जाते.ज्याची चूल बंद त्याचीअक्कल बंद या म्हणीप्रमाणे परिस्थितीनी त्यांना लाचारकेलेहोते.मांग, महार, रामोशी यांच्या दोन-दोन दिवस चुली पेटत नव्हत्या."[३] यावरुन दलितसमाजाच्या जगण्याचा भयावह संघर्ष समोर येतो.भूक ही माणसाचा प्राथमिकगरज आहे आणि ती भागली नाहीतर, मग संघर्ष अटळ आहे.हाच संघर्ष 'सावळा' या नायकाच्या माध्यमातूनसमोर आला आहे.याच कादंबरीतून सुभानाची पत्नी कासाबाईच्या मुलाची भुकेनी झालेली अवस्था या कादंबरीतून पुढे आली आहे."तिचा पाच, सहा वर्षाचा मुलगा भुकेनं व्याकुळ होऊनहुंदके देत डोळ्यांतून आसूगाळीत होता."[४] दलितसमाजातील वयाने मोठ्या असणाऱ्या व्यक्ती आपली भूक थांबवू शकतहोते मात्र लहान मुलांनाही भूक सहनहोत नसते.याचे अत्यंत वास्तव चित्रण शंकर भाऊ साठे यांनी 'सावळा' या कादंबरीतून केले आहे.

### निष्कर्ष :

१) विषम व्यवस्थेमुळे दलितांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो असे दलित कादंबरीतून दिसून येते.
२) गावगाड्यामध्ये दलित समाजाला जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो याचे चित्रण दिसून येते.
३) अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसन यामुळे त्यांच्या जगण्याच्या संघर्षात अधिक भर पडलेली दिसते.
४) विधवा, परितक्त्या दलित महिलांना जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो असे दलित कादंबरीतून समोर येते.

५) विषम व्यवस्था आणि निसर्ग यांच्या कोंडीत जगण्यासाठीचा मोठा संघर्ष दिसून येतो.
६) शहरामधील दलित समाजाला दुय्यम दर्जाचीकामे करुन किळसवाणे जीवन जगत संघर्ष करावा लागतो असे दिसून येते.
७) सुशिक्षित, दलित तरुण, नोकरदार वर्ग यांनाही जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो असे दिसून येते.

**संदर्भसूची :**

१) ढगेसुशीला, मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००४, पृ.क्र. ७९
२) साठे शंकर भाऊ, 'सावळा', विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९८९, पृ.क्र. ७९
३) तत्रैव, पृ.क्र. १
४) तत्रैव, पृ.क्र. १
५) देटे भीमसे, 'इस्कोट', प्रिया प्रकाशन, पुणे १९९४, पृ.क्र. ४१